दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम २३ मधील तरतुदीनुसार तक्रार निवारण अधिकारी नियुक्त करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन आदेश क्रमांकः कृषिआ २५१९/प्र.क्र.५३/१६अे
मंत्रालय विस्तार इमारत,
मंत्रालय, मुंबई - ३२.
तारीख: ०३ ऑगस्ट, २०१९

संदर्भ :- १. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६

२. आयुक्त (अपंग कल्याण )महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. अकआ/प्र-७/तक्रार निवारण/अधिकारी नियुक्ती/क.२०/२०१७-१८/२२, दि. २०.०६.२०१७

प्रस्तावना :-

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम २३(२) मधील तरतुदीनुसार उक्त अधिनियमातील कलम २० च्या अनुषंगाने शासकीय सेवेमध्ये असताना संबंधित अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या अपंगत्वाच्या कारणास्तव उद्भवणाऱ्या सेवाविषयक समस्यांचे निराकरण होण्यासाठी शासनाच्या प्रत्येक आस्थापनेवर तक्रार निवारण अधिकारी नियुक्त होणे आवश्यक आहे. उक्त प्रयोजनाकरिता गट-अ मधील अधिकाऱ्याची तक्रार निवारण अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात यावी, असे आयुक्त (अपंग कल्याण )महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांच्या संदर्भाधिन क्र. २ येथील दिनांक २०.०६.२०१७ च्या पत्रान्वये सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना कळविले आहे. त्यानुसार कृषि आयुक्तालय व कृषि आयुक्तालयाच्या अधिनस्त कार्यालयातील विभाग/जिल्हा स्तरावरील कार्यालयात तक्रार निवारण अधिकारी नियुक्त करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन आदेश :-

कृषि आयुक्तालय व कृषि आयुक्तालयाच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयात शासकीय सेवेत असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक समस्यांचे निराकरण होण्यासाठी गट-अ मधील खालील अधिकाऱ्यांची तक्रार निवारण अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कार्यालय | कार्यक्षेत्र | तक्रार निवारण अधिकाऱ्याचे पदनाम |
|---|---|---|---|
| १. | कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे | राज्यस्तर | संचालक (मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन), कृषि आयुक्तालय, पुणे |
| २. | विभागीय कृषि सहसंचालक | विभागस्तर | विभागीय कृषि सहसंचालक |
| ३. | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | जिल्हास्तर | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी |

२. उपरोक्त तक्रार निवारण अधिकाऱ्यांनी दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम २३ मधील तरतुदीनुसार तक्रार नोंदवही ठेवणे, तक्रारींचा निपटारा करणे व अधिनियमान्वये निर्धारित केलेली अन्य जबाबदारी काटेकोरपणे पार पाडण्याची दक्षता घ्यावी.

३. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१९०८०३१२५३०९०१०१ असा आहे. हा शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sugriv Sambhaji Dhapate

Digitally signed by Sugriv Sambhaji Dhapate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d02297f9b5e889636956e39bfae4ea112e908c0e9a7e572d4190f9709a817f51, serialNumber=fc102de27dc1b41e747ac6cbb491c4209459c3cf340720ea98fd1d95b19c9f65, cn=Sugriv Sambhaji Dhapate
Date: 2019.08.03 13:02:55 +05'30'

**( सु.सं.धपाटे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज, मुंबई
४. सचिव (कृषि) यांचे स्विय सहायक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
६. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
७. आयुक्त (अपंग कल्याण), अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
८. सर्व संचालक, कृषि आयुक्तालय, पुणे
९. संबंधित विभागीय कृषि सह संचालक/जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (व्दारा आयुक्त (कृषि), पुणे)
१०.संबंधित उपविभागीय कृषि अधिकारी/कृषि उपसंचालक/तालुका कृषि अधिकारी (व्दारा आयुक्त (कृषि), पुणे
११.कृषि सह संचालक (आस्थापना), कृषि आयुक्तालय, पुणे
१२.संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी (व्दारा आयुक्त (कृषि), पुणे)
१३.सर्व संबंधित अधिकारी (व्दारा आयुक्त (कृषि), पुणे)
१४. निवड नस्ती/१६अे